# भरतनाट्यम प्रवेशिका पूर्ण

एकूण गुण - १२५ न्यूनतम उत्तीर्ण गुण – ४४

क्रियात्मक - ७५, न्यूनतम उत्तीर्ण गुण – २६ लिखित - ५०, न्यूनतम उत्तीर्ण गुण - १८

**अभ्यासक्रम** -

लिखित –

1. अडवू, जति, तिर्माणम, कोरवई यांच्या व्याख्या
2. खालील मुद्द्यांच्या आधारे भारतातील शास्त्रीय नृत्याची माहिती.
    - मूळ उत्पत्ती स्थान
    - प्रकार (एकल/ सांघिक नृत्य)
    - प्रमुख वैशिष्ट्ये
    - संगीत (कर्नाटक/ हिंदुस्थानी)
3. मंडलभेद, स्थानक, चारी, उत्प्लवन, भ्रमरी यांच्या व्याख्या
4. भरतनाट्यम ची थोडक्यात माहिती ( भरतनाट्यमचा अर्थ, मूळ स्थान, प्रमुख वैशिष्ट्ये, नृत्यतंत्र)
5. संक्षिप्त टीपा : नाट्यक्रम, पात्रप्राण, पात्र (नर्तकी) लक्षण, सभा लक्षण
6. ताल, मात्रा, लय, आवर्तन, अंग, विभाग, सम, उसी (offbeat)

क्रियात्मक -

1. अलारिपु
    - रचनेचे सादरीकरण
    - रचनेचा राग, ताल आणि त्यात वापरलेले शिरोभेद, दृष्टीभेद, ग्रीवाभेद, मंडलभेद
    - हस्तक्रियांनुसार तालात रचनेचे शोल्लू म्हणणे
2. पुष्पांजली / कौतुकम्
    - रचनेचे सादरीकरण
    - त्यातील राग, ताल ओळखणे
    - हस्तक्रियांसहित तालात म्हणणे
3. आदि किंवा रूपक तालातील तिर्माणमचे सादरीकरण

मौखिक (सुयोग्य सादरीकरणासहित) –

1. असंयुक्त हस्त - अर्धपताक, कर्तरिमुख, मयूर आणि अर्धचंद्र यांच्या विनियोगाचे श्लोक आणि अर्थ.
2. संयुक्त हस्त - कर्कट, स्वस्तिक हस्त, डोलाहस्त, पुष्पपुट यांच्या विनियोगाचे श्लोक आणि अर्थ.
3. चतुश्र, तिश्र आणि मिश्र जाती हस्तक्रियांसहित तीनही लयीत म्हणणे
4. संयुक्त हस्त, दृष्टीभेद, ग्रीवाभेद, स्थानकमंडलभेद, हस्तप्रचार
5. विनियोग- पताक, त्रिपताक, अंजली, कपोत

## अडवू, जति, कोरवई, तिर्माणम यांच्या व्याख्या

### अडवू

- अडवू हा नृत्यातील सर्वात लहान घटक आहे. पाऊले, पाय, शरीर, हात, खांदे, मान, डोके, डोळे यांच्या एकत्रित हालचाली अडवू म्हणतात. अडवू म्हणजे भरतनाट्यम नृत्य शैलीतील मुळाक्षरे आहेत. जसे अनेक अक्षरांचा एक शब्द, अनेक शब्दांची वाक्ये उतारे बनतात तसे अनेक अडवूंच्या एकत्रित शृंखलेतून नृत्य रचना बनतात.
- अडवू करताना शरीराचा समतोल साधला जातो.
- ज्या हालचाली उजव्या बाजूने केल्या जातात त्याच डाव्या बाजूनेही केल्या जातात. हे भरतनाट्यम शैली चे वैशिष्ट्य आहे.
- अडवू हे विलंबित, मध्य, आणि द्रुत या तीनही लयींमधे केले जातात.
- भरतनाट्यम मध्ये विविध हस्तमुद्रा आणि पादभेदानुसार अडवूचे संच केलेले आहेत. उदाहरणार्थ तट्ट अडवू मधे समपाद तर नट्ट अडवून मधे अंचित पाद वापरला जातो. तसेच कुदित्तमेट मधे अग्रतल वापरला जातो. कुठलीही नृत्त रचना शिकण्यापूर्वी अशा १३ ते १५ अडवू संच शिकणे व त्याचा सराव करणे आवश्यक असते.
- तंजावर चे राजे तालुजा यांनी लिहिलेल्या 'संगीत सारामृत' तसेच 'महाभारतचुडामणी' या पुस्तकांमध्ये अडवू चे वर्णन आढळते.

### कोरवई

- कोरवई ही नृत्तरचना आहे ज्यात विविध अडवूं एकत्र करून सुरेख आकृतीबंध तयार केला जातो.
- कोरवईचा शेवट तिर्माणम ने होतो.
- जतिस्वरम, तिल्लाना अशा शुद्ध नर्तनाच्या रचनांमध्ये कोरवया वापरल्या जातात.
- विविध संचातील अडवू च्या संरचनेने नृत्तातील रचना बांधल्या जातात.

### जति

- विशिष्ट तालात बांधलेल्या नृत्ताच्या छोट्या रचनेला जति म्हणतात.
- जति हा शोल्लू बोलांवर बोलला जातो. त्याला शोल्लू कट्टू म्हणतात.
- जातिस्वरम आणि वर्णम मधे जतींचा प्रामुख्याने वापर केला जातो.
- जति ची सुरुवात ही 'धलंगु तकधिकु तकतदी गिणतोम' या किंवा अशा शब्दांनी होते.
- जतिचा शेवट ही तिर्माणम ने होतो.
- नटुवनार जति चे शोल्लू बोल बोलतात.
- कोरवई आणि जति यातला फरक म्हणजे कोरवई सुरांवर (जतिस्वरम किंवा तिल्लाना मधे) गायली जाते तर जति शोल्लू कट्टू वर बोलली जाते.

**तिर्माणम**

- तिर्माणम हा जति किंवा कोरवई च्या शेवटी येतो.
- हा शेवट अधोरेखित करण्यासाठी नृत्तातील एक प्रकार समान किंवा चढत्या किंवा उतरत्या क्रमाने ३ वेळा पुनरावृत्तीत केला जातो.
- या साठी गिणतोम किंवा तरी किट तोम या संचातील अडवू वापरले जातात.

## भारतीय शास्त्रीय नृत्याची माहिती

### भरतनाट्यम

- मूळ उत्पती स्थान - तमिळनाडू दक्षिण भारत
- प्रकार- मूळ एकल नृत्य पण आजकाल सांघिक नृत्य ही लोकप्रिय आहेत.
- मार्गम - अलारीपू, जतिस्वरम, शब्दम, वर्णम, पदम, जावळी, तिल्लाना, श्लोक
- आहार्य- कांजीवरम सिल्क च्या जरी बॉर्डर च्या साड्या किंवा त्यापासून शिवलेले ड्रेस तसेच टेम्पल ज्वेलरी वापरतात.
- प्रमुख वैशिष्ट्ये - भरतनाट्यम मधे पायाची जी मूळ स्थिती असते तिला अरमण्डी किंवा आयतमंडल म्हणतात. सादरीकरण हे नाट्यधर्मी असते. मार्गम मधे अभिनय आणि शुद्ध नर्तन यांचा समन्वय असतो. ही शैली भक्तीप्रधान असल्याने मधुराभक्तीपूर्ण रचनांवर भर असतो.
- संगीत - कर्नाटक पद्धतीचे संगीत वापरले जाते.
- वाद्ये - मृदुंग, व्हायोलिन, बासरी, वीणा, मोरसिंग, घटम
- अधिक माहिती - दक्षिण भारतातील देवळातून सादर होणारी देवदासींची नृत्यशैली म्हणून याला दासीअट्टम म्हणत होते. ब्रिटिश सरकार ने देवदासी प्रथा बंद केली. त्यामुळे ह्या नृत्याचे सादरीकरण ही बंद झाले. कालांतराने काही विद्वानांनी ह्या नृत्याचे पुनरुत्थापन करून त्याला भरतनाट्यम हे नाव दिले. भाव, राग, ताल यातील पाहिले अक्षर मिळून बनलेले तसेच भारत मुनींनी लिहिलेले म्हणून हे नाव अगदी सार्थ आहे. हीच आजची लोकप्रिय शैली आहे.

### कथ्थक

- मूळ उत्पत्ती स्थान - उत्तर भारत बनारस, जयपूर, लखनऊ, आग्रा
- प्रकार - एकल नृत्य पण ज्यातून कथा उलगडी जाते अशी सांघिक नृत्य ही लोकप्रिय आहेत.
- मार्गम - तोडा, तुकडा, आमद, परण, ठुमरी, भजन, गतभाव
- आहार्य - सिल्क च्या कपड्यांपासून बनवलेले घागरा चोली किंवा सलवार कुर्ता घालतात. चांदी, खडे आणि मोत्यांपासून बनवलेले पारंपरिक दागिने घालतात.

- प्रमुख वैशिष्ट्ये - कथक मधे भरतनाट्यम सारखा पायांचा आयात नसतो तर स्थानक पादभेदात म्हणजे सरळ उभे राहून पायांचे विविध आघात करत नृत्य करतात. यात अभिनयाला जास्त वाव नसतो तर पायांच्या आघातातून विविध ताल दर्शवणे आणि गिरक्या यावर जास्त भर असतो.

  १६ व्या शतकात उत्तर भारतात मोघलांचे राज्य होते. त्यामुळे कथक नृत्यशैली वर पर्शियन नृत्य आणि आशिया खंडातील मध्यवर्ती देश येथील नृत्याचा प्रभाव दिसून येतो. बनारस, जयपूर आणि लखनऊ ही कथक नृत्यशैलीतील प्रमुख घराणी आहेत. ताल आणि लय यांचा सुरेख समन्वय आणि आविष्कार या शैलीत दिसून येतो.
- संगीत - कथक साठी हिंदुस्थानी पद्धतीचे संगीत वापरले जाते.
- वाद्ये - तबला, पखवाज, हार्मोनियम, सितार, बासरी
- अधिक माहिती - पढंत - ज्या प्रमाणे भरतनाट्यम मधे शोल्लू बोल असतात त्या प्रमाणे कथक चे ही बोल असतात. जेंव्हा नर्तक नृत्य करतो त्याआधी हे बोल हातावर टाळी आणि बोटांच्या गणती ने ताल धरून बोलून दाखवतो आणि त्या नुसार नृत्य केले जाते. त्याला पढंत  म्हणतात. हातावर धरलेल्या तालाचे बोल पायातील घुंगरांच्या ततकारातून आणि गिरक्यांमधून दाखवणे यात ह्या नृत्याचे सौंदर्य आहे.

**<u>कुचीपुडी</u>**

- मूळ उत्पत्तीस्थान - दक्षिण भारत कुचिपुडी गाव आंध्र प्रदेश

  हिंदू तत्त्वज्ञान आणि संस्कृतीशी अत्यंत जवळचा संबंध असल्यामुळे या शैलीत संस्कृत नृत्य नाटिकांवर भर दिलेला दिसतो.
- प्रकार - एकल नृत्य पण सांघिकही  नृत्य केले जाते.
- मार्गम - प्रार्थना, जतिस्वरम, शब्दम, अष्टपदी, पदम, जावळी, तरंग
- आहार्य - विविधरंगी कांजीवरम सिल्क साड्या आणि टेम्पल ज्वेलरी वापरलं जाते.
- प्रमुख वैशिष्ट्ये - भागवत मेला च्या नाटकांमध्ये या नृत्याचा उगम झालेला दिसून येतो. भरतनाट्यम शी साधर्म्य दाखवणाऱ्या या शैलीचे नृत्याचे तंत्र मात्र भरतनाट्यम पेक्षा खूप वेगळे असल्याचे जाणवते. भरतनाट्यम प्रमाणे यात पायाचा आयत केला जात नाही. तसेच हालचाली ही भरतनाट्यम पेक्षा जास्त द्रुत गती ने केल्या जातात.  कुचिपुडी नृत्य हे प्रामुख्याने पारिजात अपहरणं, कृष्णलीला तरंगिनी, भागवत पुराणं, गीत गोविंद या  साहित्यावर आधारलेले दिसते. यात चतुर्विध अभिनयावर भर दिला जातो. भरतनाट्यम प्रमाणेच 'अभिनयदर्पण' या ग्रंथाच्या आधारे नृत्यतंत्र शिकवले जाते. याशिवाय डोक्यावर घड ठेवून नृत्य करणे, थाळीच्या कडांवर उभे राहून तोल सांभाळत नृत्य करणे अशा जवळपास ३० वैविध्यपूर्ण क्रिया यात केल्या जातात.
- संगीत - कर्नाटक पद्धतीचे संगीत वापरले जाते.

- वाद्ये - मृदुंग, व्हायोलिन, बासरी, वीणा, मोरसिंग, घटम

- अधिक माहिती - १७ व्या शतकात तीर्थनारायण आणि त्यांचे शिष्य सिधांद्र योगी यांना स्वप्न श्रीकृष्णाचे दर्शन झाले आणि त्यांच्या लेखणीतून ' पारिजात अपहरणं' ही साहित्यकृती साकार झाली. नंतर हे साहित्य 'भामकलापम' या नावाने प्रसिद्ध झाले. यात सत्यभामेची भूमिका ही मुख्य आणि अत्यंत आव्हानात्मक समजली जाते.

**मणिपुरी**

- मूळ उत्पत्ती स्थान - त्रिपुरा, मणिपूर आणि बंगाल चा काही भाग
  अर्जुनने ही नृत्यशैली उदयास आणली आणि चित्रांगदेला शिकवली अशी मान्यता आहे.
- प्रकार - प्रामुख्याने हे सांघिक नृत्य असते पण अभिनय स्त्री आणि पुरुष पात्र एकेकटे करतात. यातून रस प्रतिबिंबित होतात.
- मार्गम - यात विविध नृत्ये साकार केली जातात. मुखत्वे खांब तोहिबी, लाईहरोबा, जागोई तसेच चोलं चे विविध प्रकार जसे करताल चोलम , मंजिरा चोलम इत्यादी. रस नृत्य ही सादर केली जातात.
- आहार्य - मणिपुरी नर्तिकांचा पोशाख अगदी विशिष्ठ असतो. यात खाली गोलाकार पिंपाच्या आकारात स्कर्ट असतो. आणि वर मखमलीचा लांब बाह्यांचा ब्लाउज़ घालतात. हिरव्या पिवळ्या अशा रंगांमध्ये पोषाख शिवलेला असतो. डोक्यावर गोलाकार उंच निमुळते टोक असलेली टोपी असते आणि त्याला एक झिराझिरीत पडदा असतो ज्याने नर्तिकेचा चेहरा झाकलेला असतो. या नर्तिका पायापासून डोक्यापर्यंत ३० पेक्षा जास्त दागिने घालतात.
- प्रमुख वैशिष्ट्ये – मणिपूर येथील रास नृत्यातून ही शैली उदयास आली. नर्तिकेची आकर्षक वेषभूषा, स्वतःभोवती घेतलेल्या हळूवार गिरक्या आणि नाजूकपणे केलेल्या हस्तमुद्रा तसेच नर्तकाचे स्वतःच्या गळ्यात ढोल अडकवून नृत्य करणे यातून या शैलीचे वेगळेपण दिसून येते.
  मुख्यत्वे दादरा तालात हे नृत्य केले जाते. पण आता वेगळे ताल ही वापरले जातात. इंफाळ स्थित जवाहरलाल नेहरू मणिपुरी डांस अकॅडमी हे दिल्लीतील संगीत नाटक अकॅडमी चेच एक केंद्र असून तिथे मणिपुरी नृत्याचे प्रशिक्षण दिले जाते.
- संगीत - लोकगीते आणि लोकगीतांची धून असलेले पारंपरिक मणिपुरी संगीत या साठी वापरले जाते.
- वाद्ये - मंजिरा, चोलम (मृदुंग), बासरी, पेना आणि शंख
- अधिक माहिती - या नृत्य शैली वर वैष्णवांचा प्रभाव दिसून येतो. 'गोविंद संगीत लीला विलास' या साहित्यावर आधारित ही नृत्ये रचली जातात. यामागची कथा अशी की, राजा भाग्यचंद्र हा मोठा कृष्ण भक्त होता. त्याला कृष्णाची रासलीला स्वप्नात दिसली. त्याने त्याप्रमाणे आपल्या मुलीला तसा पोषाख करवून तिला तसे नृत्य शिकवले. कालांतराने ही शैली मणिपुरी नृत्य म्हणून लोकप्रिय ठरले. नंतर महाकवी रवींद्रनाथ टागोर यांनी या पद्धतीत मोलाचे योगदान दिले, सुधारणा केल्या आणि हे नृत्य नावारुपास आणले.

## कथकली

- मूळ उत्पत्ती स्थान - केरळ दक्षिण भारत. केरळ मधील कुट्टियट्टम, कृष्णअट्टम. कलारीपयट्ट अशा वेगवेगळ्या नृत्यांमधून ही शैली उदयास आली.
  केरळ कलामंडलं हे कथकली चे पारंपरिक आणि शास्त्रशुद्ध शिक्षण देणारे केंद्र आहे.
- प्रकार - सांघिक नृत्य
- मार्गम - मेलापदं, तोडेयं, पुरप्पडू यानंतर नृत्य नाटिका सादर केली जाते.
- आहार्य - कलाकार आपले चेहरे भूमिकांप्रमाणे वेगवेगळ्या रंगाने रंगवतात. हे रंग वेगवेगळ्या मनोवृत्तीच्या लोकांचे द्योतक असतात. जसे हिरवा रंग म्हणजे नायक, सर्वोत्तम योद्धा लाल रंग खलनायक, दुष्ट प्रवृतीचे लोक, पिवळा रंग साधू, मुनी किंवा स्त्रिया यासाठी वापरला जातो तर काळा रंग राक्षस किंवा जंगली किंवा विध्वंसक वृत्ती दर्शवतात.
  या भूमिका सत्व, रज आणि तम या गुणांमध्ये विभागल्या जातात. सत्व गुण म्हणजे चांगुलपणा, मानवता, सृजनशीलता, धर्मपालन ई. रजोगुण म्हणजे अभिमान, राजसी वृत्ती, विलासी वृत्ती, ध्येय किंवा उद्दिष्टांची कमतरता आणि तमोगुण म्हणजे क्रोधी, कोपिष्ट, बळजबरी करणारा, विध्वंसक वृत्तीचा.
- प्रमुख वैशिष्ट्ये - अत्यंत जोशपूर्ण नृत्य, थोड्याशा भीतीदायक पण अत्युच्च भावना दाखवणाऱ्या भावमुद्रा हि या शैलीची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. आजतागायत जिवंत असलेल्या ज्या काही थोड्या नृत्यपरंपरा आहेत त्यामध्ये कथकली हि अशी एकमेव शैली आहे कि ज्याला नाट्यशात्राच्या परिभाषेप्रमाणे 'परिपूर्ण रंगभूमी' म्हणता येईल. आजकाल वेळेअभावी हि नृत्ये थोडक्यात सादर केली जातात. पण पुरातन काली मंदिराच्या प्रांगणात रोज रात्री असे आठवडा भर हे खेळ चालत आणि त्यातून पुराणातल्या संपूर्ण कथा सादर केल्या जात. पण आता त्यातील थोडा भाग सादर केला जातो. कथकली च्या रंगभूषा आणि वेषभूषा ह्या विशिष्ठ असतात आणि त्या पात्रांच्या भूमिके प्रमाणे ठरतात.
  कथकली नर्तक, नर्तिका ' हस्तलक्षण दीपिका ' या पुस्तकाचे अध्ययन करून या नृत्याचे प्रशिक्षण घेतात.
- संगीत - कर्नाटक पद्धतीचे संगीत तसेच केरळ मधील पारंपरिक सोपान संगीत वापरले जाते.
- वाद्ये - श्रुतिपेटी, मंडलं, चेंडा (ड्रम) , ईडाक्का ( डमरू प्रमाणे ज्याचा मधला भाग निमुळता आणि दोन्ही बाजूचे भाग रुंद असतात असा ढोल)
- अधिक माहिती -ह्या शैलीत दोन मुख्य पद्धती दिसून येतात. त्रावणकोर येथील किदांगूर पद्धत आणि पलक्कड येथील कल्लुवाझी पद्धत.

## मोहिनीअट्टम

- मूळ उत्पत्ती स्थान - दक्षिण भारत, केरळ ( जसे कथकली हे मुख्यत्वे पुरुषांनी करावयाचे नृत्य आहे त्याप्रमाणे मोहिनीअट्टम हे स्त्रीप्रधान नृत्य आहे)

या नृत्याचे धागे दोरे समुद्र मंथनाच्या कथेत आहेत समुद्रमंथनातून निघालेले अमृत शिताफीने देवांपर्यंत पोचवण्यासाठी विष्णूने मोहिनी रूप घेतले. त्यावेळी त्यांनी जे नृत्य केले तेच मोहिनीअट्टम. ई.स. १४०० मध्ये या नृत्याचा प्रसार जास्त होऊ लागला.

- प्रकार - एकल नृत्य
- मार्गम - चोल्लेकेट्ट , जतिस्वरम, वर्णम, पदम, कृती, तिल्लाना, श्लोक, किंवा अष्टपदी
- आहार्य - सोनेरी जरी काठाची क्रीम कलर ची साडी नेसतात.
  केरळ चे पारंपरिक सोन्याचे दागिने घालतात.
- प्रमुख वैशिष्ट्ये - शरीराची, हातापायांची गोलाकार आणि सौंदर्यपूर्ण हालचाल हे या शैलीचे वैशिष्ट्य आहे. संगीत संथ लयीत असते आणि हालचाली ही संथ गतीत असतात. हे नृत्य लास्य या प्रकारात मोडते.
- संगीत - कर्नाटक आणि सोपानम पद्धतीचे संगीत वापरले जाते.
- वाद्ये - मृदुंग, एडक्का, बासरी, वीणा

**<u>ओडिसी</u>**

- मूळ उत्पत्ती स्थान - ओरिसा
- प्रकार - मूळचे एकल नृत्य पण आता सांघिक नृत्य हि लोकप्रिय आहे.
- मार्गम - भूमिप्रणाम, इष्टदेवता वंदन, स्वर पल्लवी, गीताभिनय, तारिजम, भजन किंवा मोक्ष.
- आहार्य - भरतनाट्यम प्रमाणेच मध्ये पंखा असलेला साडीचा शिवलेला ड्रेस असतो. पण या साठी ओरिसातील प्रसिद्ध अशा हातमागावर विणलेल्या कोसा साडी चा वापर केला जातो.
- मुख्य वैशिष्ट्ये - त्रिभंग म्हणजे तीन ठिकाणी वाकलेली शरीराची ठेवण हे या शैलीचे वैशिष्ट्य आहे. हालचाली अतिशय आकर्षक व डौलदार असतात. भरतनाट्यम पेक्षा वेगळ्या प्रकारच्या चारी आणि भ्रमरी असतात. तसेच हस्तमुद्रांचाही वापर आढळतो.
- संगीत - ओरिसातील पारंपरिक संगीताचा वापर केला जातो. त्याचप्रमाणे कर्नाटक आणि हिंदुस्थानी संगीत हि वापरले जाते.
- वाद्ये - पखवाज, सतार, बासरी, मंजिऱ्या ( छोट्या झान्जा )
- अधिक माहिती - या शैली चे मूळ तरुण मुलांनी सादर केलेल्या गोटीपूआ या लोकनृत्यात दिसून येते. ओरिसातील देवळात देवदासींप्रमाणे ' महारी' देवसेवा करत. त्यांच्या नृत्यातून हि शैली उदयास आली.

**<u>सत्रिय</u>**

- मूळ उत्पत्ती स्थान - आसाम
- प्रकार - मूलतः एकल नृत्य पण आजच्या काळात सांघिक नृत्ये हि केली जातात.
- मार्गम - अप्सरा नृत्य, बहार नृत्य, चाली नृत्य, दशावतारम नृत्य, मनचोक नृत्य , नटुआ नृत्य, रस नृत्य, राजघरीया चाली नृत्य, गोसाई प्रबेश , बार प्रबेश, गोपी प्रबेश, झुमुरा, नादुभंगी, सूत्रधार

- आहार्य - आसाम च्या पारंपरिक पट सिल्क आणि मुगा सिल्क ( सोनेरी सिल्क) पासून तयार केलेले पोषाख घालतात आणि पारंपरिक रॉ गोल्ड चे दागिने वापरतात. पुरुष - धोती, चादर आणि पागुरी (डोक्यावर घालायचे पागोट्यासारखे वस्त्र) घालतात. आणि स्त्रिया - घुरी, चादर आणि कांची ( कमरेचे वस्त्र) घालतात.
- प्रमुख वैशिष्ट्ये - हि नृत्य शैली १५ व्या शतकात आसाम च्या मठांमध्ये उदयास आली. पुराणातल्या कथा हा या नृत्याचा गाभा आहे. महान संत श्रीमंत शंकरदेव हे या नृत्याचे जनक मानले जातात. त्यांनी या नृत्याची जी स्वतंत्र शैली तयार केली ती आजतागायत लोकप्रिय आहे. प्राचीन काळापासून चालत आलेल्या प्रथेनुसार वैष्णव मठातील भक्तगण त्यांच्या दैनंदिन पूजेअर्चेचा भाग म्हणून किंवा उत्सवाचा भाग म्हणून हे नृत्य सादर करत असत. त्यात पुराणातल्या कथा सादर केल्या जात. त्यामागे धर्मप्रसार हे प्रमुख कारण होते. आजच्या काळात जे या मठांचे सदस्य नाहीयेत असे पुरुष व स्त्रिया हि हे नृत्य रंगमंचावर सादर करतात. त्यांच्या नृत्यात पुराणकथांव्यतिरिक्त विषय हि हाताळले जातात. या नृत्यांमध्ये हि तांडव आणि लास्य दोन्ही चा मिलाफ दिसतो.

  इ.स २००२ मध्ये संगीत नाटक अकॅडमी ने सत्रिय नृत्याला शास्त्रीय नृत्य म्हणून मान्यता दिली आहे.
- संगीत - श्री शंकरदेव आणि श्री श्री माधवदेव यांनी किहिलेली वेगवेगळ्या रागातील गीते आणि त्यांचे संगीत या नृत्यशैली साठी वापरले जाते.
- वाद्ये - पारंपरिक ढोल, टाळ, बासरी हि वाद्ये त्याचबरोबर आधुनिक काळातील व्हायोलिन आणि हार्मोनियम हि वाद्ये देखील वापरतात.

## मंडलभेद, स्थानक, चारी, उत्प्लवन, भ्रमरी

### मंडलभेद

स्थानकं चायतालीढं प्र ङ्खणप्ररितानि च ॥ २६० ॥
प्रत्यालीढं स्वस्तिकं च मोटितं समसूचिका ।
पार्श्वसूचीति च दश मण्डलानीरितानीह ॥ २६१ ॥

नृत्य करताना तसेच विश्रांती स्थानात पायांच्या वेगवेगळ्या स्थितीला मंडलभेद म्हणतात. निरनिराळे पादभेद वापरून हे केले जातात. नृत्यात देवदेवता किंवा विशिष्ठ व्यक्तिरेखा दाखवायला ह्याचा उपयोग होतो. अभिनयदर्पण मध्ये १० मंडलभेद सांगितले आहेत. ते म्हणजे स्थानक, आयात, आलिढ, प्रेंखण, प्रेरित, प्रत्यालिढ, स्वस्तिक, मोटित, समसूची, पार्श्वसूची.
आलिढ आणि प्रत्यालिढ हे मंडलभेद प्रामुख्याने नट्ट अडवू, मंडी अडवू आणि शिखर अडवू मध्ये वापरले जातात. तसेच युद्धातील आक्रमक हालचाली दाखवण्यासाठी हि वापरले जातात.
प्रेंखण मंडल हे पुरुष व्यक्तिरेखा उदा. राम, शिव, कार्तिकेय साकारण्यासाठी वापरल्या जातात. कृष्ण आणि विष्णू साठी स्वस्तिक वापरतात . तसेच शिखर अडवू मध्ये स्वस्तिक, तै तैं धत ता साठी मोटित मंडल वापरतात. अलारिपु मध्ये हि मोटित मंडल वापरले जाते. समसूची आणि पार्श्वसूची अत्यंत कमी वेळा वापरल्या जातात.

**स्थानकभेदाः**

पादविन्यासभेदेन स्थानकां षड्विधं भवेत् ।
समपादं चैकपादं नागबन्दधस्ततः परम् ।।२७४।।
ऐन्द्रं च गारुडं चैव ब्रह्मस्थानमिति क्रमात् ।

स्थानक मंडल हे नृत्याच्या सुरुवातीला आणि सरक अडवू मध्ये वापरले जातात.
समपाद, एकपाद, नागबंध, ऐंद्रम, गारुड आणि ब्रह्मस्थान असे सहा स्थानक भेद सांगितले आहेत. हि स्थानके विशिष्ठ हेतूने वापरली जातात.
एकपाद हे ब्रह्मा दाखवण्यासाठी, ऐंद्रम हे इंद्र किंवा राजा दाखवण्यासाठी, गारुड हे गरुडासाठी तसेच ब्रह्मस्थान हे ब्रह्मा किंवा ध्यानधारणा करणारी व्यक्ती दाखवण्यासाठी वापरले जाते.
समपाद आणि एकपाद या शिवाय बाकीचे स्थानक भेद कुठल्याही अडवूमध्ये वापरले जात नाहीत.

**चारी**

अथात्र चारिभेदानां लक्षणं कथ्यते मया ।।२९८ ।।
आदौ तु चलनं प्रोक्तं पश्चाच्चंक्रमणं तथा ।
सरणं वेगिनी चैव कुट्टनं च ततः परम् ।।२९९।।
लुठितं लोलितं चैव ततो विषमसञ्चरः ।
चारिभेदा अमी अष्टौ प्रोक्ता भरतवेदिभिः ।।३०० ।।

कमरेखालच्या पायांच्या हालचालींना चारी असे म्हणले जाते. नृत्य करताना किंवा अभिनय करताना पायांच्या साहाय्याने रंगमंचावर केलेल्या विविध हालचालींना चारी असे म्हणतात. अभिनय दर्पण मध्ये विविध प्रकारच्या चारी सांगितल्या आहेत, चलनं (चालणे), चंक्रमणां (झेप घेतल्यासारखी हालचाल), सरणं ( टाचेला टाच लावून सरक अडवू प्रमाणे चालणे), वेगिनी (भराभर पळणे), कुट्टना (जोरात चालणे), लुठीतं (गोलाकार हालचाल), लोलितं (थरथरत केलेली हालचाल) आणि विषम ( डावे पाऊल उजवीकडे आणि उजवे पाऊल डावीकडे टाकत चालणे).

**भ्रमरी**

भ्रमर्या लक्षणाम्यत्र वक्ष्ये लक्षणभेदतः ॥ २८६ ॥
उत्प्लुतभ्रमरी चक्रभ्रमरी गरुडाभिधा ।
तथ कपाद्भ्रमरी कुञ्चितभ्रमरी तथा ॥ २६० ॥
आकाशभ्रमरी चैव तथाङ्गभ्रमरीति च ।
भ्रमयः सप्त विज्ञ या नाट्याशास्त्रविशारदैः ॥ २६१ ॥

भ्रमरी म्हणजे गिरक्या. सात वेगवेगळ्या प्रकारच्या गिरक्या अभिनयदर्पण मध्ये सांगितल्या आहेत.

- उत्प्लुत (समपाद स्थितीत घेतलेली गिरकी)
- चक्र (त्रिपताक हस्तमुद्रा करत गोलाकार गिरकी)
- गरुड (गरुडाच्या पंखांप्रमाणे हात पसरवून, एक पाय गुढग्यातून मागे दुमडून दुसऱ्या पायावर घेतलेली गिरकी)
- एकपाद (एकदा एका पायावर आणि लगेच पाय बदलून दुसऱ्या पायावर घेतलेली गिरकी)
- कुंचित (गुढग्यात पाय दुमडून केलेल्या शरीराच्या गोलाकार हालचाली)
- आकाश (उंच उडी मारून, पाय पसरून अधांतरी म्हणजेच अवकाशात घेतलेली गिरकी)
- अनंग भ्रमरी (उंच उडी मारून खाली येताना पायात अंतर ठेवून मारलेली गिरकी)

**उत्प्लवन**

अथोत्प्लवमभेदानां लक्षणं परिकथ्यते ॥ २८२ ॥
अलगं कर्तरी वाऽश्वोऽत्प्लवनं मोटितं तथा ।
कृपालगमिति ख्यातं पञ्चधोत्प्लवनं बुधैः ॥ २८३ ॥
नृत्यातील विविध प्रकारच्या उड्यांना उत्प्लवन असे म्हणतात.

उत्प्लावन चे प्रकार खालील प्रमाणे.

- अलगं - दोन्ही हात शिखर मुद्रेत कमरेवर ठेवून दोन्ही पाय एकत्र उचलून उंच उडी मारणे. उडी मारताना हात शिखरमुद्रेत लांब पसरून परत छातीजवळ आणणे.
- कर्तरी - दोन्ही हस्त  कर्तरी मुद्रेत एक हात लांब पसरलेला व दुसरा शरीराजवळ ठेवून तिरक्या दिशेत उडी मारणे. किंवा सरळ आडव्या दिशेत उडी मारणे. उजव्या पायावर उडी घेताना डावा पाय आणि डाव्या पायावर उडी घेताना उजवा पाय क्रॉस करून दुसऱ्या पायाच्या पुढे ठेवणे.
- अश्व - दोन्ही हात त्रिपिताक मुद्रेत छातीजवळून लांब पसरून एका पायाने उडी मारून दुसरा पाय पहिल्या पायाजवळ ठेवणे.
- मोटित - मुरमंडि मध्ये उडी मारून कर्तरिप्रमाणे एका पावला मागे दुसरे पाऊल ठेवणे.
- कृपलांग - अर्धचंद्र हस्तमुद्रा घेऊन टाचा कमरेला टेकवत उंच उड्या मारणे.

## भरतनाट्यमची संक्षिप्त माहिती

**भरतनाट्यम संज्ञेचा अर्थ आणि मूळ उत्पत्ती स्थान -**

दक्षिण भारतातील तामिळनाडू मध्ये उदयास आलेली भरतनाट्यम हि नृत्यशैली भारतातील ७ प्रमुख शास्त्रीय नृत्यशैलींपैकी एक आहे. ह्या नृत्यशैलीचा उगम दक्षिण भारतातील मंदिरात देवसेवा आणि नृत्य करणाऱ्या

देवदासींच्या नृत्यात दिसून येतो. मंदिरातील सादरीकरणाच्या पद्धतीमुळे हि शैली भक्ती आणि समर्पण यांनी ठळकपणे अधोरेखित केली आहे असे म्हणता येईल. ह्यातील देवदासींचे योगदान श्रेष्ठ आहे. ब्रिटिश सरकार ने देवदासी प्रथा बंद केल्यामुळे देवदासींनी मंदिरात नृत्य करणे बंद केले. कालांतराने काही सुशिक्षित लोकांनी एकत्र येऊन ह्या नृत्य शैलीचे महत्व जाणले आणि तिची जपणूक करण्याचे ठरवले. त्यांनी ह्या नृत्य शैलीला सामाजिक मान्यता मिळवून दिली.

हळू हळू सामान्य लोकांनी ह्या कलेचे महत्व आणि त्यातील सौंदर्य जाणले. हे नृत्य शिकायला सुरुवात केली आणि आजच्या घडीला हे नृत्य भारतातील शास्त्रीय नृत्यकलांमध्ये मानाचे मिळवून लोकप्रिय ठरले आहे. इ.स १९५० मध्ये ई. कृष्ण अय्यर आणि इतर काही सुशिक्षित मंडळींनी ह्या नृत्यप्रकाराला सुयोग्य असे स्वरूप दिले. त्यांनी ह्या नृत्यशैलीचे नाव बदलायचे ठरवले जेणेकरून हि शैली देवदासींपुरतीच मर्यादित राहणार नाही. म्हणून त्यांनी ह्या शैली चे नाव दासीअट्टम बदलून भरतनाट्यम ठेवले. भाव,राग आणि ताल त्यांच्या आद्याक्षरांवरून तयार झालेले तसेच नाट्यशास्त्र लिहीणाऱ्या भरतमुनींना आदरांजली म्हणून हे नाव अगदी सुयोग्य वाटते.

**नृत्यतंत्राची प्रमुख वैशिष्ट्ये**

नृत्य तंत्र म्हणजे नृत्य ज्या पद्धतीने सादर केले जाते ती पद्धत, त्यातील हालचालींचे विशिष्ठ नियम.
प्रत्येक नृत्यशैलीचे विशिष्ठ असे तंत्र असते जे त्या शैली ला इतर शैली पासून वेगळेपण देते.
आयत मंडल किंवा अरमंडी तसेच अर्थ दाखवण्यासाठी हस्तमुद्रांचा प्रभावी वापर हि भरतनाट्यम ची काही ठळक वैशिष्ट्ये आहेत.
आयत मंडल म्हणजे दोन्ही पायांच्या टाचा एकमेकांना जुळवून पाऊले आणि गुढगे बाहेरच्या दिशेने वळवून अर्ध्या उंचीपर्यन्त खाली बसणे. यामुळे जी चौरसाकृती तयार होते तिला अरामंडि किंवा आयत मंडल म्हणतात. या चौरसाकृती पायाशी समतोल साधण्यासाठी हात खांद्याच्या सरळ रेषेत बाहेरच्या दिशेने पसरलेले असतात.
भरतनाट्यम सादरीकरणाची नाट्यधर्मी पद्धत वैशिष्ट्यपूर्ण हस्तमुद्रांमुळे अधिक प्रभावशाली ठरते.
नृत्तामध्ये ज्या विविध अडवू ची शृंखला वापरली जाते त्यात विविध प्रकारच्या मंडल भेदांचा वापर केलेला दिसतो.
पदन्यासाने जमिनीवर तसेच हातांच्या हालचालीने अवकाशात विविध रेखाकृती नर्तिका तयार करत असते. त्यामुळे असे बहुआयामी नृत्य विशेष प्रेक्षणीय ठरते.

## संक्षिप्त टीपा

आचार्य नंदिकेश्वरांनी अभिनयदर्पण या ग्रंथात नर्तकी कशी असावी तिच्या ठायी शारीरिक सौंदर्य आणि क्षमते बरोबरच आणखी कुठले गुण असायला हवेत हे पात्रप्राण आणि नर्तकी लक्षण या दोन श्लोकांच्या आधारे नमूद केले आहे.

**पात्रप्राण**

जवः स्थिरत्वं रेखा च भ्रमरी दृष्टिरश्रमः ।।२७ ।।
मेधा श्रद्धा वचो गीतं पात्रप्राणा दश स्मृताः ।

एवंविधेन पात्रेण नृत्यं कार्य विधानतः ।।२८ ।।

तन्वी रुपवती श्यामा पीनोव्रतपयोधरा ।।२३।।

नर्तकीच्या अंगी असायला हवेत असे गुण म्हणजे -

1. जव - लवचिकता
2. स्थिरत्वं - स्थिरता
3. रेखा - रेषांचे ज्ञान
4. भ्रमरी - गिरक्यातील सहजता
5. दृष्टी - उत्तम नेत्र कटाक्ष
6. अश्रम - सहनशक्ती
7. मेधा - बुद्धी
8. श्रद्धा - भक्ती किंवा कलेवर आणि गुरूंवर निष्ठा
9. वचो - गोड बोलणे
10. गीतं - सुरेल गाणे

हे दहा गुण नर्तकीच्या ठिकाणी असायलाच हवेत. प्राण म्हणजेच शरीरासाठी जे श्वासाचं महत्व आहे तसेच हे गुण नर्तकी साठी श्वासांइतकेच महत्वाचे आहेत. नर्तकी लवचिक शरीराची, चपळतेने हालचाली करणारी असावी. पण जेंव्हा ती एखादी पोझ घेईल तेंव्हा मात्र स्थिरता तिच्याजवळ असायला हवी. नाहीतर त्या नृत्याकृतीचे सौंदर्य रसिकांपर्यन्त पोहोचणार नाही. नृत्तातून उमटणाऱ्या रेषांचे तिला ज्ञान असायला हवे. कौशल्यपूर्ण आणि सहजतेने गिरक्या घेता यायला हव्यात. हालचाली आणि त्यातला अर्थ रसिकांपर्यन्त पोहोचवण्यासाठी उत्तम नेत्रकटाक्ष असणे आवश्यक आहे. तिच्याकडे न थकता नृत्य करण्याची शारीरिक क्षमता असायला हवी. तिच्याकडे बुद्धी तर असायलाच हवी तरच ती सर्व रचना व्यवस्थित लक्षात ठेवू शकेल. आपल्या कलेवर आणि गुरूंवर श्रद्धा असेल तरच ती निष्ठेने कलोपासना करू शकेल. तिचे बोलणे सुस्पष्ट आणि गोड असावे. रंगमंचावर नृत्य सादर करताना जरी नर्तकी स्वतः गाणे गात नसली तरी तिला तालासुरांचे आणि संगीताचे ज्ञान असल्यास तिचे सादरीकरण अधिक उठावदार होईल. यातील लवचिकता, स्टॅमिना, गाणे यासारखे गुण सरावाने जमू शकतात पण श्रद्धा हि मात्र तिच्या मनाच्या गाभ्यातून उमटली पाहिजे.

**पात्र(नर्तकी)लक्षण**

तन्वी रुपवती श्यामा पीनोव्रतपयोधरा ।।२३।।

प्रगल्भा सरसा कान्ता कुशला ग्रहमोक्षयोः ।

विशाललोचना गीतवाद्यतालानुर्तिनी ।।२४।।

परार्ध्यभूषासंपन्ना प्रसन्नमुखपंकजा ।

एवंविधगुणोपेता नर्तकी समुदीरिता ।। २५ ।।

1. तन्वी - तरुण आणि सौष्ठवपूर्ण

2. रूपमती - सौंदर्यवती
3. श्यामा - सावळ्या  वर्णाची
4. पिनोन्नतपयोधरा - भरदार छाती असलेली
5. प्रगल्भा - हुशार, विषयाची जाण असलेली
6. सरसा - आकर्षक
7. कांता - सुंदर
8. कुशला - कौशल्यवान, निष्णात
9. ग्रहमोक्षयो - प्रत्येक बीट व्यवस्थित पकडून कुठे नृत्य सुरु करावं आणि कुठे थांबवावं याचे अचूक ज्ञान असलेली.
10. विशाललोचना - सुंदर आणि मोठे डोळे असणारी
11. गीत वाद्य तालानु वर्तिनी - गीत, वाद्ये आणि ताल यांचा समन्वय साधून त्याप्रमाणे नृत्य करणारी.
12. परार्ध्यभूषसंपन्ना - सुंदर आणि  सुयोग्य वेशभूषा केलेली आणि योग्य ते दागिने घातलेली.
13. प्रसन्न मुख पंकजा - प्रसन्न आणि सुहास्य वदन (मुख) असलेली

वर वर्णन केलेले सर्व शारीरिक गुणवर्णन असल्यामुळे सर्व गुण एका व्यक्तीत सापडणे अवघड आहे. पण काही गुण जसे ग्रहमोक्षयो, परार्ध्यभूषसंपन्न, गीतवाद्यातालानुवर्तिनी असे काही गुण सरावाने किंवा अभ्यासाने मिळवता येतात.

**सभालक्षण**

सभाकल्पतरुर्भाति वेदशाखपजीवितः ।
शास्त्रपुष्पसमाकीर्णो विद्वद्भ्रमरशोभितः ।।१९।।

आचार्य नंदिकेश्वर लिहितात कि रसिकांची सभा हि कल्पवृक्ष प्रमाणे असावी. ह्या वृक्षाच्या शाखा  म्हणजे वेद, पुराणे आहेत. त्याला शास्त्र रूपी फुले आहेत. आणि त्यातील ज्ञानरूपी मध चाखण्यासाठी रसिक रूपी भुंगे गुंजारव करत आहेत. उत्तम दर्दी किंवा रसिक नृत्यसादरीकरण बघतात,  त्यातील रसास्वाद घेतात आणि त्यावर योग्य प्रतिक्रिया देतात. ह्या प्रतिक्रिया कुठल्याही कलाकाराला स्वतः मध्ये सुधारणा करण्यासाठी अत्यंत मोलाच्या असतात.

### व्याख्या ताल, मात्र, लय, आवर्तन, अंग / विभाग, सम, उसी / off beat

**ताल -** ताल म्हणजे हस्तक्रियेने मापाला जाणारा काळ. ताल म्हणजे विशिष्ठ काळाचे सामान भाग केलेले वर्तुळ आहे. हे समान भाग टाळी ने आणि बोटे मोजणे किंवा इतर हस्तक्रियेने मोजले जातात.

**मात्रा** - तालाच्या मूळ एककाला मात्रा म्हणतात. मात्रेमुळे तालाला विशीष्ट स्वरूप मिळते.

**लय -** तालाच्या गतीला लय असे म्हणतात. दोन हस्तक्रियांच्या मधल्या सामान काळाने लय ओळखली जाते. लय तीन प्रकारच्या आहेत. विलंबित (संथ गती) , मध्य (मध्यम गती), द्रुत (जलद गती)मध्य हि विलंबित च्या दुप्पट गती असते. द्रुत गती हि मध्य च्या दुप्पट आणि विलंबित च्या चौपट असते.

**आवर्तन -** ताल मोजण्याची क्रिया टाळीपासून सुरु होते. नंतर बोटे मोजणे, उपडा हात अशा क्रिया पूर्ण करत परत टाळीवर येऊन ताल पूर्ण होतो. या एका वर्तुळाला एक आवर्तन असे म्हणतात.

**अंग / विभाग -** तालाच्या लहान घटकांना अंग किंवा विभाग असे म्हणतात. सुरुवातीला ६ अंग प्रचलित होते पण आता त्यातले ३ अंग वापरात आहेत. ते असे
अनुधृत - एक मात्रा असते जी इंग्रजी अक्षर 'U' ने लिहिली आणि एका तळव्याने दुसऱ्या तळव्यावर मारलेल्या टाळी ने दाखवली जाते.
धृत - यात दोन मात्रा असतात. याचे चिन्ह आहे इंग्रजी अक्षर O. एक नेहमी सारखी टाळी वाजवणे आणि एक दोन्ही तळवे आकाशाच्या दिशेने उपडे करून एकमेकांवर आघात करणे याने दाखवाले जाते.
लघु - चतुश्र, तिश्र, मिश्र, खंड आणि संकीर्ण या जातींप्रमाणे लघुच्या मात्रा ३,४,५,७ आणि ९ या प्रमाणे वेगवेगळ्या असतात. पहिल्या मात्रेवर टाळी वाजवून पुढल्या मात्रा करंगळीपासून सुरुवात करून अंगठ्याच्या दिशेने बोटे मोजून दाखवल्या  जातात.

**सम -** तालाच्या पहिल्या मात्रेला सम असे म्हणतात. संगीतात आणि नृत्यात हि जागा अत्यंत महत्वाची असते आणि ती ठळकपणे  दाखवली जाते. या जागी ताल आणि सूर एक होतात.

**उसी / Off beat -** समेच्या आधी किंवा नंतर सुरु होणाऱ्या तालाला उसी किंवा ऑफ बीट म्हणतात.

## असंयुक्त हस्त विनियोग

### अर्धपताक हस्त विनियोग

पल्लवे फलके तीरे उभयोरितिवाचके ।।१०३।।
क्रकचे छुरिकायां च ध्वजे गोपुरशृङ्गयोः ।
युज्यतेऽर्धपताकोऽयं ततत्कर्मप्रयोगके ।।१०४।।
झाडाचे पान, फलक (writing board), नदीकिनारा, दोन (गोष्टी किंवा व्यक्ती) दाखविण्यासाठी, कात्री आणि सूरी, ध्वज किंवा पताका, मंदिराचा कळस आणि शिंग दाखवण्यासाठी अर्धपताक हस्तमुद्रा वापरतात.

### कर्तरीमुख हस्त विनियोग

स्त्रीपुंसयोस्तु विश्लेषे विपर्यासपदेऽपि वा ।

लुण्ठने नयनान्ते च मरणे भेदभावने ।।१०६।।
विद्युदर्षेप्येकशय्याविरहे पतने तथा ।
लतायां युज्यते यस्तु स करः कर्तरीमुखः ।।१०७।।
स्त्री आणि पुरुष यांचे वेगळेपण दाखवणे, उलटणे किंवा विरुद्ध अर्थी, चोरी, डोळे, मरणे, भेदभाव, वीज, विरह आणि वेली दाखवण्यासाठी कर्तरी मुख हस्त वापरला जातो

**मयुर हस्त विनियोग**

मयूरास्ये लतायां च शकुने वमने तथा ।
अलकस्यापनयने ललाटतिलकेषु च ।।१०९।।
नद्युदकस्य निक्षेपे शास्त्रवादे प्रसिद्धके ।
एवमर्थेषु युज्यन्ते मयूरकरभावनाः ।।११०।।
मोर, वेली, पक्षी, वांती, केस सावरणे, कपाळावर कुंकू किंवा तिलक लावणे, हाताने नदीच्या पाण्यातील वरचा थर बाजूला करणे, शास्त्र आणि त्यासंबंधी बोलणे, प्रसिद्ध यासाठी मयूर हस्त वापरतात.

**अर्धचंद्र हस्त विनियोग**

चन्द्रे कृष्णाष्टमीभाजि गलहस्तार्थ केऽपि च ॥ १११ ॥
भल्लायुधे देवतानामभिष चनकर्मणि ।
भुक्पात्रे चोद्भवे कट्यां चिन्तायामात्मवाचके ॥ ११२ ॥
ध्याने च प्रार्थने चापि अङ्गानां स्पर्शने तथा ।
प्राकृतानां नमस्कारे अर्धचन्द्रो नियुज्यते ॥ ११३ ॥
कृष्ण पक्षातील अष्टमीचा चंद्र, हाताने गळा धरणे ( मारण्याच्या आवेशात), भाल्यासारख्या शस्त्राने वार करणे, देवांवर अभिषेक करणे, भूक किंवा भोजन करणे, निर्माण होणे किंवा करणे, कटि (कंबर), चिंता, मी स्वतः या अर्थी, ध्यान करणे, प्रार्थना करणे, शरीराला स्पर्श करणे आणि लोकांना नमस्कार करणे या साठी अर्धचंद्र हस्ताचा उपयोग केला जातो.

## संयुक्त हस्त विनियोग

**कर्कट हस्त विनियोग**

समूहागमने तुन्ददर्शने शङ्खपूरणे ॥ १७६ ॥
अङ्गानां मोटने शास्त्रोन्नमने च नियुज्यते ।
एकत्र जमून (समूहाने) जाणे, (मोठे) पोट दाखवणे, शंख फुंकणे, हात पाय ताणून आळस देणे, झाडाच्या फान्दीवर रेलणे यासाठी कर्कट हस्त वापरतात.

**स्वस्तिक हस्त विनियोग**

स्वस्तिकहस्तः पताकयोः सन्नियुक्तः करयोर्मणिबन्धयोः ॥ १८० ॥

संयोगेन स्वस्तिकाख्यो मकरे विनियुज्यते ।

दोन्ही हस्त पताक मुद्रेत मनगटापाशी एकत्र जुळवले असता स्वस्तिक हस्त तयार होतो जो मगर दाखवण्यासाठी वापरतात.

**डोला हस्त विनियोग**

डोलाहस्तः पताक ऊरूदेशस्थे डोलाइस्तोऽयमिष्यते ॥ १८१ ॥

नाट्यारम्भे प्रयोक्तव्य इति नाट्यविदो विदुः ।

नाट्याची सुरुवात डोला हस्ताने केली जाते.

**पुष्पपुट हस्त विनियोग**


नीराजनाविधौ वारिफलादिग्रहणेऽपि च ।

सन्ध्यायामघ्यर्यदाने च मन्त्रपुष्पे च युज्यते ॥ ८३ ॥


निरांजनाने ओवाळणे, फळ किंवा पाणी ग्रहण करणे, संध्यासमयी अर्घ्य देणे, मंत्रोच्चारात फुले वाहणे यासाठी पुष्पपुट हस्त वापरतात.

## अभ्यास

खालील नृत्य प्रकार ओळखा

| | | | |
|---|---|---|---|
| 1 |  | 5 |  |
| 2 |  | 6 |  |
| 3 |  | 7 |  |
| 4 |  | 8 |  |

खालील वाद्ये ओळखून ती कुठल्या शास्त्रीय नृत्यासाठी वापरली जातात ते सांगा.

| | |
|---|---|
|  |  |
|  |  |
|  |  |
|  |  |
|  |  |
|  |  |

**अलारिपु -** 'अलारिपू' 'म्हणजे उमलणे' (मूळ 'अलारू' हा शब्द तेलगू, तमिळ आणि इतर द्रविडी भाषांमध्ये आढळतो). शुद्ध नर्तनाची. मृदंगाच्या बोलांवर हि रचना केली जाते. या रचनेत मूळ हालचालींचा समावेश असतो. अलारिपुची सुरुवात डोळ्याच्या मानेच्या खांद्यच्या सूक्ष्म हालचालींनी होते, नर्तकीच्या शरीरसासाठी हा एक प्रकारचा warm up exercise असतो तालाच्या ठेक्यामुळे मनाची एकाग्रता देखील साधली जाते. समभंग स्थितीतून स्थानक, अरमंडी व मुरमंडी या तीनही मंडलांचा वापर केला जातो. एकच बोल विलंबित, मध्य व धृत लयीत म्हंटला जातो. अलारिपुचा शेवट छोट्याश्या जती / तीर्माणमनी होतो. प्रामुख्याने पंच जातींमध्ये अलारिपु बांधला जातो. पारंपरिक अलारिपु तिश्र, चतुश्रं आणि मिश्र चापू तालात केले जातात.

**कौतुकं / कौतुवं -** कौतुकं किंवा कौतुयं हि नृत्याची रचना आहे. या रचनेत तालावर बांधलेले शोल्लू व ताल बद्ध शब्द असतात. नावाप्रमाणेच या रचनेत एखाद्या देवतेचे गुणगान, कौतुक, वर्णन केले जाते उदाः नटेश कौतुकं, गणपती कौतुकं. साधारणतः कौतुकं हि रचना चतुश्र, तिश्र किंवा आदि तालात बांधली जाते व या रचनेचा राग नाटई असतो. या रचनेतील अभिनय विस्तृत स्वरूपाचा नसून शब्द संचारी स्वरूपातील असतो. तालाच्या ठेक्यात येणाऱ्या शब्दांचे सौन्दर्य वाढवण्यासाठी ताटिमेट्टी चा वापर केला जातो.

**तिर्माणम् -** ज्या नृत्तप्रकारामध्ये केवळ तीन वेळा चढत्या, उतरत्या किंवा समान क्रमाने सलग अडवू केले जातात, अशा नृत्यसंचाला तिर्माणम् म्हणतात. तिर्माणम् करताना वापरले जाणारे विशिष्ट अडवू हे गिणतोम् किंवा तरिकिटतोम् या आडवूंच्या प्रकारातले असल्याकारणाने या अडवूंना तिर्माणम् अडवू असे संबोधले जाते. कोणत्याही कोरवई किंवा जतिचा शेवट हा कायम तिर्माणम् (अडवूनीच) केला जातो.

**जति -** विशिष्ट तालात बांधलेल्या नृत्ताच्या छोट्या रचनेला जति म्हणतात. जति हा शोल्लू बोलांवर बोलला जातो. त्याला शोल्लू कट्टू म्हणतात. जातिस्वरम आणि वर्णम मधे जतींचा प्रामुख्याने वापर केला जातो. जति ची सुरुवात ही 'धलंगु तकधिकु तकतदी गिणतोम' या किंवा अशा शब्दांनी होते.जतिचा शेवट ही तिर्माणम ने होतो. नटुवनार जति चे शोल्लू बोल बोलतात. कोरवई आणि जति यातला फरक म्हणजे कोरवई सुरांवर (जतिस्वरम किंवा तिल्लाना मधे) गायली जाते तर जति शोल्लू कट्टू वर बोलली जाते.